Department of Paediatric Ophthalmology and Strabismology


Dr. (Mrs.) Abha Kanade
MBBS, DOMS

Dr. Jai Kelkar
DNB, DOMS, FCPS
Paed. Ophth. Fellowship (Belgium)


NATIONAL INSTITUTE OF OPHTHALMOLOGY
MULTI-SPECIALTY EYE HOSPITAL


National Institute Of Ophthalmology
1187/30, Off Ghole Road, Near Mahatma Phule Museum,
Shivajinagar, Pune - 411 005.
Phone: +91-20-255 363 69 / 255 363 24, Fax: +91-20-255 845 72
Registered under Bombay Public Trust Act, 1950. Reg. No. F8185

११८७/३०, घोले रोड, फुले म्युझियम जवळ, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.
दूरध्वनी: +९१-२०-२५५३६३६९, २५५३६३२४
Email: administrator@nioeyes.com, www.nioeyes.com
बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट, १९५० द्वारे नोंदणीकृत संस्था. रजि. नं.: एफ ८१८५




# माझ्या मुलाला चष्मा आहे...

NATIONAL INSTITUTE OF OPHTHALMOLOGY
MULTI-SPECIALTY EYE HOSPITAL

## माझ्या मुलाला चष्म्याचा नंबर का आहे?

मुलांना चष्मा हा त्यांच्या पालकांकडून अनुवंशिकतेने येऊ शकतो. जर एका पालकास चष्म्याचा नंबर असेल तर त्यांच्या काही मुलांना चष्म्याचा नंबर असू शकतो आणि जर दोन्ही पालकांना चष्म्याचा नंबर असेल तर त्यांच्या सर्व मुलांना चष्म्याचा नंबर असू शकतो. पालकांना व घरात कोणलाही चष्मा नसला तरी देखील कधी कधी लहान मुलांना चष्म्याचा नंबर लागतो. अनुवंशिकता हे एकच कारण नसल्याने हे असे होते.

## चष्म्यामुळे आपणास स्पष्ट कसे दिसते?



या चित्रात निरोगी डोळा दाखविला आहे. निरोगी डोळ्यात येणारे प्रकाश किरण हे डोळ्याच्या मागील पडद्यावर एका विशिष्ट ठिकाणी एकत्रित येतात. त्यामुळे वस्तू स्पष्टपणे दिसतात.



ऱ्हस्व दृष्टीच्या डोळ्यात (Myopic Eye) डोळ्याची लांबी ही जास्त असल्यामुळे प्रकाश किरण डोळ्याच्या मागील पडद्यावर एकत्र येत नाहीत व वस्तू स्पष्ट दिसत नाहीत. जेंव्हा आपण आंतरवक्र भिंग (मायनस नंबरचे भिंग) डोळ्याच्या पुढे ठेवता तेंव्हा प्रकाश किरण डोळ्याच्या मागील पडद्यावर एकत्रित येतात व आपणास प्रतिमा स्पष्ट दिसते. दीर्घ दृष्टीच्या डोळ्यात (Hypermetropic Eye) डोळ्याची लांबी कमी असते, त्यामुळे प्रकाश किरण डोळ्याच्या मागील पडद्यावर एकत्रित होत नाहीत व वस्तू स्पष्ट दिसत नाहीत.



जेंव्हा आपण बर्हिवक्र भिंग (प्लस नंबरचे भिंग) डोळ्यासमोर ठेवतो तेंव्हा वस्तू आपणास स्पष्ट दिसते.



## अस्टीगमॅटीझम (Astigmatism) म्हणजे काय?

बुबुळाला दोन वक्रता असतात – आडवी आणि उभी वक्रता. या दोन वक्रतांमध्ये समतोल नसेल व एक फार वक्र असेल तर त्याला Astigmatism असे म्हणतात.

त्या व्यक्तीस वस्तुभोवती सावली सारखे दिसते किंवा सरळ रेषा तिरक्या दिसतात. हा दोष Cylindrical भिंग देवून दूर करतात. या भिंगात फक्त एका विशिष्ट दिशेत नंबर असतो.

## चष्मा सतत वापरल्यास माझ्या मुलाचा नंबर कमी होईल का?

चष्मा सतत वापरल्यानंतर देखील चष्म्याचा नंबर कमी होत नाही. जसे प्रथम सांगितले त्याप्रमाणे डोळ्याच्या लांबीवर नंबर अवलंबून असतो. त्यामुळे जशी मुलांची वाढ होते तशी डोळ्याची लांबी वाढते. म्हणूनच मुलांचा नंबर १८ वर्षांपर्यंत (कधी कधी २१ वर्षांपर्यंत) स्थिर होत नाही.

## जास्त टी. व्ही. बघितल्याने, गाजर, पालेभाज्या न खाल्ल्यामुळे, माझ्या मुलाला चष्म्याचा नंबर लागलेला आहे का?

हा बऱ्याच वेळा विचारण्यात येणारा प्रश्न आहे. फक्त टी. व्ही. बघितल्याने चष्म्याचा नंबर लागत नाही. तसेच गाजर, पालेभाज्या, काही व्हिटॅमीन न खाल्ल्यामुळे देखील चष्म्याचा नंबर लागत नाही. त्याचप्रमाणे ज्या मुलाला चष्म्याचा नंबर आहे, त्याने नियमित गाजर किंवा पालेभाज्या खाल्यास त्याचा नंबर कमी होत नाही.

## माझ्या मुलाचे जर डोके व डोळे दुखत नसतील, तरीही त्याला चष्मा घालणे गरजेचे आहे का?

होय! चष्म्याच्या नंबर प्रमाणे डॉक्टर तुम्हाला चष्मा कसा वापरायचा हे सांगतील. फक्त चष्मा वापरल्यामुळे देखील, कधी कधी आळशी डोळ्यात सुधारणा होते.

## माझ्या मुलाची चष्म्यापासून सुटका कशी मिळवू?

जेंव्हा ८–२१ वर्षांपर्यंत नंबर स्थिर होतो (जर चष्म्याचा नंबर एक वर्ष स्थिर असेल) तेंव्हा लेझरच्या सहाय्याने चष्म्याचा नंबर घालवता येतो. लेझर ही फार सुरक्षित व परिणामकारक उपचार पध्दत आहे. लेझरने चष्मा कायमचा जातो.